विद्या विकास मंडळ

रामकृष्ण महादेव साळगांवकर उच्च माध्यमिक विद्यालय

मडगांव गोवा

प्राथमिक परीक्षा - डिसेंबर २०२५

इयत्ता : बारावी | विषय : मराठी (व्दितीय भाषा) | वेळ : ३ तास

दिनांक : १६।१२।२०२५ | गुण : ८०

---

**सूचना :** (i) शुध्द्लेखनाचे नवीन नियम पाळावेत.

(ii) उजवीकडील अंक प्रश्नांचे पूर्ण गुण दर्शवितात.

## विभाग 1 - व्याकरण

खालील शब्दांची भाववाचक नामे लिहा :

1. माता 1
2. भीषण 1
3 पोरका 1

खालील शब्दांची विशेषणे लिहा :

4. कष्ट 1
5. सुगंध 1
6. भारत 1

खालील शब्दांचे विरूध्दार्थी शब्द लिहा :

7. भाग्यहीन 1
8. शाप 1
9. विश्वास 1

खालील शब्दांचे लिंग बदलून लिहा :

10. मादी 1

11. साधू 1

12. वाघ 1

खालील शब्दांचे वचन बदलून लिहा :

13. शेळया 1

14. आरसे 1

15. सतरंजी 1

खालील वाक्यातील अधोरेखित शब्दांच्या जाती लिहा :

16. रिकामी पाकिटं हाती घेऊन काही चाहते झक मारली आणि आलो अशी तोंड करून एकमेकांकडे बघू लागले. 4

## विभाग 2 - गद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

17. केळकरीणबाईंनी जोराची किंकाळी का फोडली ? 1

18. कर्णिकानां 'श्री मंगेशा'च्या उग्र तरी मायाळू वाटणाऱ्या चित्राप्रमाणे कोणाची तसबीर देवस्वरुप वाटायची ? 1

19. 'रावसाहेब' पाठातील रावसाहेबांना गजाभाऊच्या बायकोने भेट म्हणून काय देण्याचे ठरविले? 1

खाली दिलेली वाक्ये योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

20. कष्टाच्याच जोडीला आशा,उत्साह,जोम, तरतरी हे सर्व गुण असल्याशिवाय ________ 1

अ. यत्नदेवाची उपासना होत नाही.

आ. यत्नदेवाच्या पूजेची सांगता होत नाही.

इ. यत्नदेवाची कृपा होत नाही.

21. गेंडयाला नेहमीच ________________ 1

अ. एकाच जागी उभं राहण्याची सवय आहे

आ. एकाच जागेवरून दूर पळून जाण्याची सवय आहे.

इ. एकाच जागी विष्ठा टाकण्यासाठी जाण्याची सवय आहे.

22. आशू नेत्रदानाचा फॉर्म भरायला तयार झाला कारण ________________ 1

अ. त्याला आंधळयाबद्दल कणव वाटत होती.

आ. त्याची आई तो फॅार्म घेऊन आली होती.

इ. त्याला फॉर्म भरून गडावर जायचं होतं.

खालील वाक्याचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

23. 'त्या पावसाचा पोटाला काय उपयोग? त्यानं फक्त मोती पिकतात.' 5

**किंवा**

" ये रे श्याम ! आपण फन्ना करू .फडशा पाडू."

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

24. डॉ. माशेलकरांच्या आयुष्यात जादूचा दिवस कसा उगवला? 5

**किंवा**

' पंत मेले राव चढले ' या पाठात रावांच्या घरी फुललेल्या आनंदाचे वर्णन दिवाकरांनी कसे केले आहे ?

## विभाग 3 - पद्य

खालील प्रश्नांची उत्तरे प्रत्येकी एका वाक्यात लिहा :

25. स्वतःच्या मनाची अवस्था व्यक्त करण्यासाठी संत नामदेवांनी उदाहरण म्हणून दिलेल्या पक्ष्याचे नाव लिहा. 1

26. 'वंद्य वंदे मातरम्' ही कविता कोणी लिहिली ? 1

27. फाटक्या झोपडीला कवी ना.धों.महानोरांनी कोणती उपमा दिलेली आहे ? 1

खाली दिलेल्या कवितेच्या ओळी योग्य पर्याय निवडून पूर्ण करा :

28. रविशशि अग्नि नेणिती ज्या रूपा । स्वप्रकाशरूपा नेणें ______॥ 1

29. ________ न माझि ही माता, रे, कथिल हे अगस्तिस आता रे , 1

30. देखणी ती________ जी तृप्तिची तिर्थोदके । 1

( जीवने ,अबला ,सरिता ,वेद )

खालील पद्यांशाचे संदर्भासह स्पष्टीकरण लिहा :

31. मोट नाडा विहिर दोरी । अवघी व्यापिली पंढरी ॥ 5

**किंवा**

आन माये , जवा लय शिकून लंबर काडीन पयला

तवा तुजं डोळं भरून येत्याल ना घळाघळा

खालील प्रश्नाचे उत्तर 7 ते 8 ओळींत लिहा :

32. 'हरिभजनावीण काळ' या अभंगात अंतरीचा ज्ञानदिवा तेवत ठेवण्यासाठी सोहिरोबानाथ काय करायला सांगतात ? 5

**किंवा**

जीवनाकडे पाहण्याचा कोणता दृष्टिकोण 'सांगा कसं जगायचं ?' या कवितेतून प्रकट झाला आहे?

## विभाग 4 – लेखन

खाली दिलेल्या वाक्प्रचारांना त्याखाली दिलेल्या अर्थाचा योग्य पर्याय निवडून लिहा :

33. जायबंदी होणे________________ 1

- गोळी घालणे
- हल्ला करणे
- त्रास होणे
- जखमी होणे

34. कणव वाटणे___________________ 1

- मोठयाने रडणे
- दया वाटणे
- गुदमरुन जाणे
- खावेसे न वाटणे

35. घायकुतीला येणे ________________ 1

- लाचार होणे
- खंत वाटणे
- अस्वस्थ होणे
- काळजी नसणे

36. हुज्जत घालणे________________ 1

- वाद घालणे
- स्वस्तात घेणे
- पळून जाणे
- बाजूला सारणे

खालील उतारा वाचून त्याखाली दिलेल्या प्रश्नांची उत्तरे लिहा.

आजकाल प्रत्येकजण सेवेच्या नावावर जगण्याचा प्रयत्न करतो. 'आधी माझ्या खाण्यापिण्याची व्यवस्था करा, मग मी सेवा करतो,' या वृत्तीला सेवा म्हणता येईल काय ? ती सेवावृत्ती नसून ढोंग आहे. नोकरी ही कधीच सेवा होऊ शकत नाही.परंतु ज्यावेळी माणूस आपली नोकरी सांभाळून निष्काम भावनेने जास्त काम करतो तेव्हा ती सेवा होऊ शकते.नोकरसुध्दा सेवक मानले जाऊ शकतात,परंतु त्यासाठी अधिकारी वृत्तीपेक्षा सेवेच्या भावनेने लोकांची कामे करावी लागतील. समजा एखादा नोकर आपल्या कामासाठी रस्त्याने निघाला आहे. रस्त्यात एखादा दगड बाजूला करून रहदारी सुरळीत चालू करण्याची आवश्यकता आहे.त्यावेळी नोकर वृत्तीचा माणूस त्या कामात सहभाग घेणार नाही. उलट म्हणेल, हे काम माझे नाही. सेवाभावी माणूस दुसऱ्यांच्या प्रगतीसाठी तळमळत असतो. जो विश्वात्म्याला आपल्या सात्त्विक प्रयत्नांनी प्रसन्न करतो ,जो परस्परांशी सहकार्याची,सामंजस्याची भूमिका घेतो व जो प्रत्येक जीवमात्राच्या विकासासाठी धडपडतो त्यालाच आपण सेवाभावी पुरुष मानला पाहिजे.

- राष्ट्रसंत श्रीतुकडोजी महाराज

प्रश्नः

37. प्रत्येकजण कशाच्या नावावर जगण्याचा प्रयत्न करतो ? 1

38. संत तुकडोजी महाराजांच्या मते नोकरसुध्दा सेवक कधी मानले जातात ? 2

39. सेवाभावी वृत्तीचा माणूस कसा वागतो ? 2

40. संस्कार उच्च माध्यमिक विद्यालय ' पणजी येथे संपन्न झालेल्या 'गोवा मुक्तिदिन' कार्यक्रमाचा वृत्तांत 10 ते 12 ओळींत लिहा. 5

41. 'कचऱ्याची समस्या' या विषयावर दोन मित्र/ मैत्रिणीमधील संवाद सुमारे 10 ते 12 ओळींत लिहा. 5

42. खालीलपैकी कोणत्याही एका विषयावर सुमारे पंचवीस ओळींचा निबंध लिहा. 10

मी पाहिलेलं रम्य स्थळ

**किंवा**

वाढते पर्यटन आणि गोव्यासमोरील आव्हाने

**किंवा**

माझा आवडता लेखक

**किंवा**

जुन्या प्रवासी बसचे आत्मवृत्त

**किंवा**

पाऊस पडलाच नाही तर.....